# वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ
# परभणी

वाचा : १. विद्यापीठ परिपत्रक क्रमांक अेपीसी-३० दिनांक २२.११.१९८८
२. विद्यापीठ परिपत्रक क्रमांक अेपीसी-१ दिनांक ११.१.२०१८
३. शासन निर्णय क्रमांक संकीर्ण-२३१८/प्रकृ ३/का-१७ दिनांक १.३.२०१८

अेपीसी-१ दिनांक ९.४.२०१९

## परिपत्रक

ज्याअन्वये,संदर्भिय क्र.१ येथील परिपत्रकामधील मधील (उ) व संदर्भिय क्र.२ च्या परिपत्रका नुसार ज्या विद्यापीठ अधिकारी/कर्मचा-यांची वयाची ४५ वर्ष पूर्ण झालेली आहे,अशा अधिकारी/कर्मचा-यांना विभागीय परिक्षा उत्तीर्ण होण्यापासून सूट देण्यात आलेली आहे.

आणि ज्याअन्वये,संदर्भिय शासन निर्णय क्र.३ मधील १(ब) नुसार सेवाप्रवशोत्तर/विभागीय परीक्षा अनुत्तीर्ण झाल्यामुळे रोखून ठेवण्यात आलेली वेतनवाढ ही उमेदवाराने परीक्षा उत्तीर्ण केल्याच्या दिनांकापासून किंवा वयाची ५० वर्ष पूर्ण झाल्यामुळे परीक्षा उत्तीर्ण होण्यापासून सूट मिळाल्याच्या दिनांकापासून देय असेल.

तसेच संदर्भिय शासन निर्णय क्र.३ येथील मुद्दा क्र. २ मध्ये नमूद केल्यानुसार पदोन्नतीसाठीची विभागीय परीक्षा उत्तीर्ण होण्यापासून सूट मिळण्याकरीता कर्मचा-याने त्या पदावर किमान १५ वर्षे सेवा पूर्ण करणे अनिवार्य राहील.त्यामुळे संबंधित पदावर कर्मचा-याची १५ वर्षे सेवा पूर्ण झाल्याचा दिनांक किंवा त्याच्या वयाची ५० वर्षे पूर्ण झाल्याचा दिनांक यापैकी जे नंतर घडेल त्यानंतर लगतचा दिनांक हा कर्मचा-यास पदोन्नतीसाठी विहित केलेली विभागीय परीक्षा उत्तीर्ण होण्यापासून सूट देण्याचा दिनांक समजण्यात येईल.

त्याअन्वये विद्यापीठ अधिकारी/कर्मचारी यांना उपरोक्त नमूद शासन निर्णयातील मुद्दा क्र.१ (ब) व २ नुसार विभागीय परिक्षा उत्तीर्ण होण्यापासून सूट देण्यात येईल.संदर्भिय १ व २ परिपत्रकातील इतर मजकूर जशास तसा कायम राहील. सदरील आदेशाची अमंलबजावणी शासन निर्णयातील तरतूदीनुसार दिनांक १.३.२०१८ पासून अंमलात येईल.

कुलसचिव

१. संचालक शिक्षण तथा अधिष्ठाता (कृषि),संचालक संशोधन/संचालक विस्तार शिक्षण वनामकृवि, परभणी.यांना देवून कळविण्यात येते की सदरील परिपत्रक त्यांच्या अधिनस्त असलेल्या अधिकारी/कर्मचारी यांच्या निदर्शनास आणून दयावे.
२. नियंत्रक/विद्यापीठ अभियंता,वनामकृवि,परभणी.
३. प्रभारी अधिकारी,मध्यवर्ती संगणक केंद्र,परभणी यांना देवून कळविण्यात येते की, सदरील परिपत्रक विद्यापीठ संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात यावे.